तरुण भारत
Amcha Pune | 2026-08-15 | Page- 4
epaper.tarunbharat.net

# सायबर फसवणुकीपासून बचावासाठी अंध-अपंग प्रशिक्षण केंद्रात जनजागृती

**पुणे, १४ ऑगस्ट**

नवजीवन अंध अपंग प्रशिक्षण केंद्र येथे क्विक हील फाऊंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थिनी मधुरा बंगाली आणि काजल खैरनार यांनी उपस्थितांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले.



या सत्रात सुरक्षित ऑनलाइन व्यवहार, फिशिंग, बनावट लिंक व वेबसाइट्स, ओटीपी फसवणूक, सोशल मीडिया सुरक्षितता आणि मजबूत पासवर्डचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. संशयास्पद लिंक किंवा संदेश उघडू नयेत तसेच वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींशी शेअर करू नये, असे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनघा वैद्य, शिक्षक समन्वयक प्रा. मनाली सपकाळ आणि विभागप्रमुख रूपाली सराफ यांचे सहकार्य लाभले.

Powered by Bharati Web